आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -संध्याकाळी ७.००वाजता

२५ सप्टेंबर २०२४ -मंगळवार

ठळक बातम्या

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या पुणे दौऱ्यावर/ २२ हजार कोटींहून अधिक रकमेच्या प्रकल्पांचं करणार भूमिपूजन आणि लोकार्पण
- बदलापूर प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदेच्या मृत्यू प्रकरणी उच्च न्यायालयाकडून पोलिसांची हजेरी / ही चकमक नसल्याची स्पष्टोक्ती
- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेलं मनोज जरांगे यांचं बेमुदत उपोषण स्थगित
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं ८५ हजारांची पातळी ओलांडली, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २६ हजाराच्या वर बंद

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या पुणे दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या हस्ते संध्याकाळी २२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजन आणि लोकार्पण होणार आहे. त्यात शिवाजीनगर ते स्वारगेट मेट्रो, बिडकीन औद्योगिक क्षेत्र, सोलापूर विमानतळाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाचा समावेश आहे. प्रधानमंत्री या दौऱ्यात भिडे वाड्यातल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचं स्मारक आणि स्वारगेट - कात्रज मेट्रोची पायाभरणी करतील. ३ परम रुद्र संगणकांचं लोकार्पण, हवामान आणि वातावरण बदलासाठीची उच्च क्षमता कम्प्युटिंग यंत्रणा, महामार्गावर ट्रक चालकांसाठी सोयी सुविधा, विविध प्रकारचे इंधन भरण्यासाठीच्या ६ हजारांहून अधिक स्थानकांचं लोकर्पणही प्रधानमंत्री यावेळी करतील. यानंतर प्रधानमंत्री एसपी कॉलेजच्या मैदानावर जनसभेला संबोधित करतील. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी इथल्या तयारीची पाहणी केली.

<><><><>

माथाडींसाठीचा कायदा आणखी मजबूत केला जाईल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं आहे. माथाडी कामगारांचे नेते अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. माथाडी कामगारांचा मोबदला स्वतःच्या खिशात घालणाऱ्यांवर सरकारनं कारवाई केली असून यापुढंही अशी कारवाई केली जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

बदलापूर बालअत्याचार प्रकरणातला मुख्य आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यूप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं आज पोलिसांची चांगलीच हजेरी घेतली. अक्षय शिंदेनं पोलिसाकडचं शस्त्र हिसकावून गोळीबार केल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे. त्यावर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठानं पोलिसांवर प्रश्नांची सरबत्ती केली. गोळीबाराच्या बाबतीत प्रशिक्षित असलेले पोलिस आरोपीला आवरु शकले नाहीत. यावर कसा विश्वास ठेवायचा याला चकमक म्हणता येणार नाही, ही चकमक नाहीच, असं मत न्यायालयानं व्यक्त केलं. या चकमकीनंतर पोलिसांनी काय पावलं उचलली याची विचारणा न्यायालयानं केली. या घटनेच्या दृश्यांमधे फेरफार टाळण्यासाठी ते सिल केलं आहे का, या घटनेतलं शस्त्र पिस्तुल होतं, की रिव्हॉलवर, असे प्रश्न न्यायालयानं विचारले. या प्रकरणाची निपक्षपाती चौकशी अपेक्षित आहे. तशी ती होत नसल्याचं दिसलं, तर आम्हाला आदेश काढावा लागेल, असं न्यायालयानं बजावलं. या प्रकरणी पोलिसांविरुद्ध गुन्हा नोंदवला जावा, तसंच या घटनेशी संबंधित सीसीटिव्ही चित्रण सुरक्षित ठेवलं जावं, अशी मागणी अक्षय शिंदेच्या वडलांच्या वकीलानं आजच्या सुनावणीदरम्यान केली.

<><><><><>

जुनी पेन्शन योजना लागू करणे आणि संच मान्यतेचा जाचक अटी रद्द करणे या प्रमुख मागण्यांसाठी आज सोलापुरात शिक्षकांनी मोर्चा काढला. सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षक संघटनांनी हा मोर्चा काढला. **गडचिरोली, धाराशिव, वाशिम** या जिल्ह्यातही शिक्षकांनी आज आंदेलन केल्याचं आमच्या वार्ताहरांनी कळवलं आहे.

<><><><><>

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटी इथं गेल्या ९ दिवसांपासून सुरू असलेलं बेमुदत उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा मनोज जरांगे यांनी आज केली. आता उपोषण करून नाही तर सत्तेत बसून आरक्षण मिळवू असं जरांगे यांनी यावेळी म्हटलं. दरम्यान, जालन्याचे अधिकारी आणि पोलीस अधिक्षकांनी जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली.

<><><><><>

जागतिक बाजारातल्या तेजीमुळं देशातल्या दोन्ही शेअर बाजारांनी आज विक्रमी पातळी गाठली. सेन्सेक्स पहिल्यांदाच ८५ हजारांच्या वर आणि निफ्टी पहिल्यांदाच २६ हजारांच्या वर जाऊन बंद झाले. घसरणीसह सुरू झालेल्या शेअर बाजारात अखेरच्या अर्धा तासात जोरदार तेजी दिसून आली. दिवसअखेर सेन्सेक्स २५६ अंकांची तेजी नोंदवून ८५ हजार १७० अंकांवर बंद झाला. निफ्टी ६४ अंकांची वाढ नोंदवून २६ हजार ४ अंकांवर स्थिरावला.

<><><><><>

'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त १७ सप्टेंबर ते दिनांक २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा सुरु आहे. या अनुषंगानं आकाशवाणीशी बोलताना मुंबईतल्या गृहिणी वैशाली पवार यांनी सांगितलं..,

<><><><><>

लातूर जिल्ह्यातल्या धनेगाव इथल्या मांजरा धरणातून विसर्ग सुरू असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. धऱणात येणाऱ्या पाण्याची आवक लक्षात घेत विसर्ग कमी किंवा जास्त केला जाण्याची शक्यता आहे. नदीकाठच्या गावातल्या नागरिकांनी नदीपात्रात प्रवेश करू नये, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे. दरम्यान, बुलडाणा जिल्ह्यातही पावसानं जोरदार हजेरी लावली.

<><><><><>

हवामान विभागानं पालघर आणि नाशिक जिल्ह्यांसाठी उद्या रेड अलर्ट जारी केला आहे. येत्या दोन दिवसांत पुणे, नाशिक, सातारा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत राज्यात अनेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. नैऋत्य मोसमी पावसाची परतीची रेषा कायम असून कालपासून कोकणात काही ठिकाणी, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस झाला.